वाचा:-१) सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.टीआरएन-०९/प्र.क्र.३९/०९/१२-अ, दि.२३/१०/२०११
२) संचालनालयाचे स्थायी आदेश क्र.०३/२०१७, दिनांक ०३/०२/२०१७.
३) संचालनालयाचे स्थायी आदेश क्र.०४/२०१८, दिनांक ३०/०७/२०१८.

---

स्था.१८/ब/ ले.प.अ.निर्गमन /वलेप अहवाल/न.क्र.१८३/

**संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा,**
**महाराष्ट्र राज्य,**
**कोंकण भवन, ६ वा मजला,**
**नवी मुंबई -४०० ६१४**

**स्थायी आदेश क्र. ०२ /२०२०, दिनांक** 23 OCT 2020

विषय:- जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, नगरपंचायती व ग्रामपंचायती यांचे लेखापरीक्षण अहवाल विहित मुदतीत निर्गमित करण्याबाबत.

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० मधील कलम ८ नुसार लेखापरीक्षण पूर्ण झाल्यावर शक्य तितक्या लवकर परंतु ३ महिन्यांपेक्षा उशिरा नसेल अशा मुदतीत लेखापरीक्षण तयार करुन संबंधित प्राधिकाऱ्यांना पाठविणे अनिवार्य आहे. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम १४०(१) नुसार ग्रामपंचायत लेखापरीक्षणाच्या समाप्तीनंतर २ महिन्यांचे आत लेखापरीक्षण अहवाल संबंधित प्राधिकाऱ्यांना पाठविणेबाबत निर्देश देण्यात आले आहेत. लेखापरीक्षण अहवाल विहित मुदतीत निर्गमित करणेबाबत वाचामधील अ.क्र.२ अन्वये निर्देश देण्यात आले आहेत.

जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, नगरपंचायती यांचे संबंधित घटकांचे लेखापरीक्षण पूर्ण झाल्यावर लेखापरीक्षण पथकाने लगतचे कार्यालयीन कामकाजाचे २ दिवस कार्यालयात उपस्थित राहून लेखापरीक्षण प्रारुप अहवाल तयार करण्याबाबत कामकाज पहावे व सदर अहवाल विहित मुदतीत निर्गमित न झाल्यास पथक प्रमुख व अहवालाचे अंतिमीकरण करणारा अधिकारी यांची संयुक्तिक जबाबदारी राहील असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच सदर स्थायी आदेशाद्वारे ग्रामपंचायत लेखापरीक्षण अहवाल विहित मुदतीत निर्गमित न करणाऱ्यांवर विभागीय सह संचालक यांनी प्रशासकीय कार्यवाही करावी, असे वाचामधील अ.क्र. ३ द्वारा निर्देश देण्यात आले आहेत.

तथापि, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, नगरपंचायती व ग्रामपंचायती यांचे लेखापरीक्षण अहवाल निर्गमनाचा आढावा घेतला असता प्रारुप लेखापरीक्षण अहवाल तयार करण्यास व लेखापरीक्षण अहवाल निर्गमित होण्यास दिरंगाई होत असल्याचे निदर्शनास येते. यास्तव खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) संचालनालयाद्वारा वाचामधील २ व ३ अन्वये देण्यात आलेल्या निर्देशांनुसार विहित मुदतीत अहवाल निर्गमित करण्याबाबत व अहवाल विहीत मुदतीत निर्गमित न झाल्यास करावयाच्या कारवाईच्या अनुषंगाने विहित तरतुदींचे काटेकोररीत्या पालन करण्यात यावे.

२) विहीत मुदतीत लेखापरीक्षण अहवाल निर्गमित न झाल्यास याबाबत जबाबदार असणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांचेबाबत यथास्थिती विभागीय सह संचालक / सहाय्यक संचालक यांनी नियमोचित प्रशासकीय कारवाई करावी.

३) विभागीय सह संचालक यांचे स्तरावर होणाऱ्या आढावा बैठकीमध्ये लेखापरीक्षण अहवाल निर्गमनाबाबत सविस्तर आढावा घेण्यात यावा.

४) सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे संदर्भ क्र.१ मध्ये नमूद शासन निर्णयाद्वारे शासन सेवेत सर्व स्तरावरील कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढवून प्रशासन गतिमान करण्याकरीता राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना विविध टप्प्यांवर प्रशिक्षण देण्याबाबत निर्देश देण्यात आले. यानुसार संचालनालयाद्वारे राज्य प्रशिक्षण धोरण योजनेअंतर्गत प्रशिक्षण देण्याकरीता विभागीय सह संचालकांना अर्थसंकल्पीय अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते.

राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत विभागीय सह संचालक कार्यालयातील कर्मचारी तसेच जिल्हा कार्यालयातील कर्मचारी यांच्या तांत्रिक क्षमता वाढवण्याकरीता राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत विहित उजळणी प्रशिक्षण, पदोन्नतीनंतरचे व बदलीनंतरचे प्रशिक्षण यात MAINS प्रणालीविषयक प्रशिक्षण व संगणकीय प्रशिक्षण याचा अंतर्भाव करण्यात यावा. सद्यस्थितीत सदर प्रशिक्षण कार्यक्रम Online पध्दतीने घेता येईल.

जिल्हा स्तरावर होणाऱ्या लेखापरीक्षकांच्या मासिक सभेत MAINS प्रणालीच्या कार्यान्वयनाबाबत लेखापरीक्षकांना येणाऱ्या अडचणी याबाबत आढावा घेण्यात यावा.

MAINS प्रणालीच्या कार्यान्वयनाबाबत अडचणी असल्यास सहाय्यक संचालक (संगणक), स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय यांना ई-मेलद्वारे अडचणी कळविण्यात याव्यात. विभागीय सह संचालक स्तरावरील आढावा बैठकीत अधिनस्त जिल्हा कार्यालायतील कर्मचाऱ्यांच्या तांत्रिक क्षमतेबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात यावा.

सदर आदेशाची काटेकोररीत्या अंमलबजावणी करुन लेखापरीक्षण अहवाल विहित मुदतीत निर्गमित करण्याची दक्षता घेण्यात यावी.

(संजय शहा)
संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य.

प्रत :- १. सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
२. सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, जिल्हा कार्यालय.
३. सहाय्यक संचालक (संगणक), स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय.